**प्रस्तावना:-**

**विषय:- भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका समिती क्र.१ कार्यक्षेत्रातील रहेमतपुरा कम्युनिटी हॉल, शांतीनगर मौजे-नागांव स.नं. १३६ या हॉलचे भाडयाच्या दरात वाढ करुन दर निश्चित करणे बाबत.**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने मौजे- नागांव स.नं. १३६ मध्ये दिनांक ४/६/२०२३ रोजी रहेमतपुरा,शांतीनगर येथे नवीन नागरकांच्या सोयीकरीता (COMMUNITY HALL) बांधकाम आला आहे. दि. ४/६/२०२३ मध्ये तळ अधिक एक मजल्याचे बांधकाम पुर्ण करण्यात आलेले आहे. सदरचा कम्युनिटी हॉल नागरिकांना लग्न कार्य व इतर सांस्कृतिक कार्यक्रमाकरीता वाजवी भाडयाच्या दरात मिळावा या उद्देशाने बांधण्यात आला आहे. तसेच नगररचना विभाग यांच्याकडील अहवालानुसार रहेमतपुरा कम्युनिटी हॉल, शांतीनगर येथील प्रति दिवस भाडे रु. ५०४३/- असे भाडे होत आहे. तसेच महानगरपालिका तसेच सर्व सांस्कृतिक हॉल करीता मा. महासभा ठराव क्र. ४५ दि. ०१/११/२०१२ अन्वये दर वर्षी १० टक्के भाडेवाढ करण्याबाबत निश्चित केलेले आहे.

सांस्कृतिक हॉलच्या भाडयाच्या दराची बाजारभावाशी तुलना करता आणि पाणी ,वीज आणि देखभालीकरीता होणा-या खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्या मानाने महानगरपालिकेच्या भाडयाचे दर तुटपुंजे आहेत/कमी आहेत. त्यामुळे महानगरपालिकेस आर्थीक तुट सोसावी लागत आहे. सबब महानगरपालिकेस होणारी आर्थीक तुट कमी करण्याच्या दृष्टीकोनातुन रहेमतपुरा कम्युनिटी हॉल, शांतीनगर,भाडयाच्या दरात वाढ करणे क्रम प्राप्त आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७९ च्या तरतुदी नुसार महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेच्या विनियोग संबंधीच्या तरतुदी नुसार महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या भाडयाचे दर हे बाजार भावानुसार असणे आवश्यक आहे. त्याकरीता नगररचना विभागाकडुन उक्त हॉलचे बाजार भावाप्रमाणे भाडयाचे दर निश्चित करण्याबाबत दि. ४/१२/२०२३ च्या पत्रान्वये अभिप्राय घेण्यात आलेले आहेत ते खालील प्रमाणे.

**२. भाडे निश्चिती:- भिवंडी महानगरपालिकेचा रहेमतपुरा कम्युनिटी हॉल, शांतीनगर मौजे- नागांव येथील स.नं. १३६ भाडे निर्धारण अहवाल**

४. बांधकामाचे वर्ष :- सन २०२३ तळमजला अधिक एक मजला

५. बांधकाभाचा प्रकार :- तळमजला आर.सी.सी. पहिला मजला स्ट्रील स्टक्चर

६. बांधकाम क्षेत्र ( बांधकाम अभियंता यांनी उपलब्ध करुन दिलेले मोजमाप नुसार)

तळमजला :- २४१५.०० स्के.फुट

पहिला मजला :- २४१५.०० स्के.फुट

------------------

एकुण बाधित क्षेत्र ४८३०.०० स्के.फुट

वरील प्रमाणे हॉलचे भाडे प्रति दिवस रु. ५०४३/- मात्र निश्चित करुन देऊन माहितीसाठी सादर यामध्ये वीज आणि पाण्याचा खर्च धरलेला नाही. तसेच भाडयामध्ये १८% जी.एस.टी. आकारल्यास एकुण भाडे रु. ५९५१/- असे प्रति दिवस होत आहे. रहेमपुरा कम्युनिटी,शांतीनगर हॉलचे एकुण भाडयाचे दर रु.५९५१/- होत आहे. सदर रहेमपुरा कम्युनिटी,शांतीनगर हॉलचे बाजार भावाप्रमाणे निश्चित करुन दिलेले दरास मान्यता मिळणेच्या प्रस्तावास मालमत्ता व्यवस्थापक, मुख्य लेखा परिक्षक,मुख्य लेखा व वित्त अधिकारी,उप आयुक्त,अतिरिक्त आयुक्त यांनी

शिफारस केलेली आहे. राज्य शासनाकडुन आयुक्त यांची प्रशासक म्हणुन नियुक्ती केलेली आहे. मा.प्रशासक तथा आयुक्त यांना स्थायी समिती व महानगरपालिकेचे सर्व अधिकार असल्याने सदरचा प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त यांची मान्यता मिळणेकामी सविनय सादर

**प्रशासक ठराव क्र.** 339

**दिनांक:-** १९/०१/२०२४

नगररचना विभागाने प्रस्तावित केलेले रहेमपुरा कम्युनिटी,शांतीनगर हॉलचे एकुण भाडयाचे दर रु.५९५१/- होत आहे. तरी हॉल भाडे प्रस्तावित केलेले दरास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ च्या तरतुदीनुसार भाडयाचे दर बाजारभावानुसार असणे अनिवार्य आहे. आणि विदयमान भाडयाचे दर कमी असल्याने महानगरपालिकेची होणारी आर्थिक तुट कमी करण्याच्या दृष्टीने, मी प्रशासक तथा आयुक्त म्हणुन प्राप्त झालेले महासभा व स्थायी समितीचे अधिकारानुसार दरात वाढ करुन दर निश्चित करण्यास मान्यता देत आहे.

**(अजय विलास वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**विषय:- भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका अंतर्गत प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम (फेज II) अंतर्गत एकत्रित मानधनावर अस्थायी स्वरुपात नियुक्त करण्यात आलेल्या ३५ कर्मचा-यांना मनपा सेवेत पदावर समावेशन देणे बाबतचा प्रस्ताव शासन मंजूरीस्तव ठेवणे बाबत.**

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरीता शासन स्तरावरील अटी व शर्तीच्या अधिन राहून मनपा स्तरावर एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी आर.सी.एच.- II अंतर्गत शासनाचे ५ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र व आर.सी.एच.- II चे १० प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र असे एकूण १५ नागरी आरोग्य केंद्र स्थापित करुन या ठिकाणी शहरातील नागरीकांना औषधोपचाराच्या बाह्यरुग्ण सेवा तसेच कुटुंब कल्याण अंतर्गत महिलाचे व बालकांचे औषधोपचार व लसीकरण व गृहभेटी तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यस्तरीय कार्यक्रम "पल्सपोलिओ, गोवर रुबेला, रोटा व्हायरस, मिशन इंद्रधनुष्य यांसारखे कार्यक्रम तसेच जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना अशा योजना नियमित राबविण्यात येतात.

याअनुषंगाने महानगरपालिका स्तरावर आर.सी.एच.- II हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. १ एप्रिल २००५ पासून संपूर्ण राज्यभर आर.सी.एच.-II हा कार्यक्रम कार्यान्वित आहे. कार्यक्रमांचा मूळ हेतु माता मृत्युदर व बाल मृत्युदर कमी करणे असा आहे. याकरीता २००७-०८ करीता १०० % अनुदान देय होते. सन २००८-०९ मध्ये कर्मचा-यांच्या वेतनावरील ५० % खर्च केंद्र शासनाकडून व उर्वरीत ५० % खर्च महानगरपालिकेमार्फत करण्यात आला. सन २००९-१० मध्ये केंद्र शासन व भिवंडी नि. शहर महानगरपालिका खर्चाचा हिस्सा २५ % व ७५ % असा होता. तसेच १ एप्रिल २०१० नंतर १०० % वेतन महानगरपालिकेने देणे बंधनकारक करण्यात आले.

मनपा ठराव क्र. १३० नुसार भिवंडी महानगरपालिकाकरीता ७६ पदे प्रजनन व बाल आरोग्यसेवांसाठी शासनाच्या निकषाप्रमाणे प्रस्तावीत करण्यात आली. यानुसार एकूण ४१ पदे मनपा सेवेत सामाविष्ट करण्यात आली उर्वरीत ३५ पदे यांच्या मानधनाची जबाबदारी महानगरपालिका घेणेबाबत प्रशासकिय मंजूरी असा ठराव पारीत करण्यात आला. यानुसार सन २००७ पासून विहीत पद्धतीने शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे करारतत्वावरील ३६ पदे भरण्यात आली. सदरच्या कर्मचा-यांचे १०० % वेतन महानगरपालिका निधीतून सन २०१० पासून अदा केला जात आहे.

सदर कर्मचा-यांची सन २००७ ते सन २०२२ असे एकुण १० ते १४ वर्ष नियमित शहरातील नागरीकांना सेवा दिली आहे. याबाबत सदरहू कर्मचा-यांना कायम करणेबाबत प्रस्ताव सादर करणेकामी तत्कालीन आयुक्त यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार प्रशासनाकडून अंमलबजावणी करण्यात आली आहे. यानुसार सद्यस्थितीत कार्यरत ३५ अधिकारी व कर्मचारी यांना भिवंडी मनपा आस्थापनावर कायम करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविणे त्याचप्रमाणे आर.सी.एच.- II कर्मचा-यांनी वैद्यकिय आरोग्य विभागात मानधन तत्वावर केलेली दिर्घ सेवा, सदर कर्मचा-यांनी कोविड-१९ प्रादुर्भाव काळात केलेले काम तसेच वैद्यकिय आरोग्य सेवेची आवश्यकता त्याचप्रमाणे अन्य महानगरपालिका यांनी आर.सी.एच.- II या कार्यक्रमांतर्गत समावेशनाबाबत केलेली कार्यवाही लक्षात घेता ३५ कर्मचाऱ्यांपैकी ज्यांची वयोमर्यादा जास्त

आहे अशी वयोमर्यादा शिथिल करून पुर्वलक्षी प्रभावाने सेवेत सामावून घेण्यास तसेच सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करणे यानुसार प्रशासकिय ठराव होणेस नम्र विनंती.

**प्रशासकिय ठराव क्र.** 332 **दिनांक :-** 23/07/2024

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात वैद्यकिय आरोग्य विभागामार्फत १५ नागरी आरोग्य केंद्र कार्यरत असून सदर आरोग्य केंद्रातून बाह्य रुग्ण सेवा तसेच कुटुंब कल्याण कार्यक्रम अंतर्गत महिला व बालकांचे औषध उपचार व लसीकरण तसेच आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रम पल्स पोलिओ, गोवर रुबेला, रोटा वायरस, मिशन इंद्रधनुष्य असे कार्यक्रम तसेच जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृ वंदना योजना अशा योजना नियमितपणे व प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. सदर नागरी आरोग्य केंद्राकरिता प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आर.सी.एच.- II अंतर्गत मनपा ठराव क्र. १३०, दिनांक २३/०१/२००६ चे मान्यतेनुसार व शासनाच्या भरती प्रक्रीयेच्या मार्गदर्शक सुचना नुसार मंजुर कंत्राटी पदापैकी वेळोवेळी भरण्यात आलेली पदे यानुसार ३५ कर्मचारी सद्यस्थितीत कार्यरत असून त्यामध्ये वैद्यकिय अधिकारी (०३), ऑक्झीलरी नर्स मिडवाईफ (३०), लिपिक (०१), डेटा ऐंट्री ऑपरेटर (०१) या पदाचा समावेश आहे. सदर कर्मचा-यांचे माहे एप्रिल २०१० पासूनचे १००% वेतन / मानधन महानगरपालिका फंडातून करण्यात येत आहे. सदरच्या ३६ कर्मचा-यांनी वैद्यकिय आरोग्य विभागत मानधन तत्वावर केलेली दिर्घ सेवा, कोविड-१९ प्रादुर्भाव काळात केलेले काम तसेच वैद्यकिय आरोग्य सेवेची आवश्यकता त्याचप्रमाणे अन्य महानगरपालिकांनी मानधन तत्वावर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना शासन मान्यतेने वेळोवेळी संबंधीत महापालिकेचे नियमित सेवेत आर.सी.एच.- II कर्मचा-यांचे समावेशन करण्यात आले आहे. सबब ३५ कर्मचाऱ्यांपैकी ज्यांची वयोमर्यादा जास्त आहे अशा सर्व कर्मचाऱ्यांची वयोमर्यादा शिथिल करून पुर्वलक्षी प्रभावाने महानगरपालिका सेवेत सामावून घेण्यास शिफारस करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदर प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करण्यात येत आहे. यानुसार आर.सी.एच. II मधील सद्यस्थितीत कार्यरत कर्मचाऱ्यांना महानगरपालिका सेवेत समावेशन करणे आवश्यक आहे. सबब प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आर.सी.एच.- II अंतर्गत मंजूर पदावर कंत्राटी पध्दतीने दिर्घकाळ कार्यरत असलेल्या ३५ कर्मचा-यांची इमाने इतबारे केलेली अविरत सेवा लक्षात घेता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका सेवेत समावेशन करणे कामी शासन मंजूरीकरिता प्रस्ताव सादर करणे कामी मान्यता देत आहे.

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागास वर्गीय वस्तीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत मा.माजी. नगरसेवक, श्री. संतोष एम.शेट्टी यांच्या मागणी नुसार खालील विकास कामांचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे. सदर प्रस्तावास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या सर्व अटी व निकष लागू आहेत.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मंजुरी करण्याचा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावांस मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठवावयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१७ मधील पदमानगर वॉटर वर्क्स कंम्पाऊंड येथे वाचनालय /अभ्यासिका तयार करणे | ८४,६६,९३९/- |

**ठराव क्र.** 333 **दिनांक :-** 23/09 /२०२४

मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेली १ विकास कामे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद १ प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## बांधकाम विभाग

**प्रस्तावना**

**विषय :- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत करावयाच्या विकास कामांच्या प्रस्तावास मा.जिल्हाधिकारी यांच्या प्रशासकीय मान्यतेबाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मागास वर्गीय वस्तीमध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत मा.माजी. नगरसेवक, श्री. संतोष एम.शेट्टी यांच्या मागणी नुसार खालील विकास कामांचे प्रस्ताव तयार करण्यात आले असून त्यास शहर अभियंता, मुख्यलेखा परिक्षक, मुख्य लेखा वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे. सदर प्रस्तावास लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेच्या सर्व अटी व निकष लागू आहेत.

शासन आदेश क्र. एमसीओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४. दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी मा.प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार सदरच्या प्रस्तावास मंजुरी करण्याचा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार सदरच्या खालील प्रस्तावांस मा. जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेकरीता पाठवावयाची असल्याने त्यास मंजुरी मिळणेकामी सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१७ मधील वॉटरवर्क्स कंम्पा.येथील बौध्द विहारास नविन डोम तयार करणे संरक्षण भिंत बांधणे व अभ्यंगंताकरिता नविन रुम तयार करणे. | १९,९९,३२५ /- |

**ठराव क्र.** 338 **दिनांक :-** 23/09 **/२०२४**

मा.जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे उपरोक्त सादर केलेली १ विकास कामे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेच्या निकषात बसत असून उपरोक्त नमूद कामाची निकड लक्षात घेता सदर योजने अंतर्गत विकास कामे करणेकामी विभागाने शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एम.सी.ओ.२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि- १४, दि.०६जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिनिशमनपा उपरोक्त नमूद १ प्रस्तावास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे प्रशासकीय मंजुरी करीता पाठविणेस मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय:- भिवंडी पुर्व मतदार संघातील भि.नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४ येथील अन्सारी प्ले ग्राउंड येथील संरक्षण भिंतीचे दुरुस्ती जॉगिंग ट्रॅक करणे व इमारतीचे नुतनीकरण करणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.६४,९९,१४५/- मात्र करिता ई-निविदा सुचना क्र.११५/२०२३-२४ टेंडर नं. ९६५३३९ दिनांक २४/११/२०२३ ते ०१/१२/२०२३ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. या कामी ४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. दिनांक ०५/१२/२०२३ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली. सदरच्या निविदांचे कागदपत्रांची छाननी अंती निविदा समितीने मे.पुरवी एंटरप्रायजेस, मुंबई व मे.जियाउल्ला खान,समीउल्ला खान, अमरावती यांची निविदा दस्तऐवज अपुर्ण असल्यामुळे अपात्र ठरविण्यात आली आहे. उर्वरित २ ही निविदांचे दस्तऐवज पुर्ण असल्यामुळे निविदा समितीने पात्र ठरविण्यात आल्या आहेत. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक २८/१२/२०२३ रोजी दु./साय.१.१८ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| **१** | **मे.मानसी कन्स्ट्रक्शन, मुंबई** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६ टक्के कमी दराने** | **६४६०१४९.९२१** |
| २ | मे.राजेंद्र शेषराव श्रीराव, अमरावती | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.२२ टक्के जादा दराने | ६५७८४३४.३५६ |

वरील पैकी मे.मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६ टक्के कमी दराची रक्कम रुपये. ६४,६०,१५०/- (अक्षरी- चौसष्ठ लाख साठ हजार एकशे पन्नास रु.) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं.** 334 **दिनांक :-**23/09 **/२०२४**

मे.मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६ टक्के कमी दराची रक्कम रुपये. ६४,६०,१५०/- (अक्षरी- चौसष्ठ लाख साठ हजार एकशे पन्नास रु.) मात्र च्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी पुर्व मतदार संघातील भि.नि.श.महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.४ येथील अन्सारी प्ले ग्राउंड येथील संरक्षण भिंतीचे दुरुस्ती जॉगिंग ट्रॅक करणे व इमारतीचे नुतनीकरण करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई, यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**
o/c